१०९४
म. ग्रं. सं. ठाणें
...नर चरित्र
...नं. २५२

श्रीराम समर्थ.

साधुवर्य

# श्री गुलाबराव महाराज

## यांचें संक्षिप्त चरित्र.

REFBK-0000995
REFBK-0000995

प्रकाशक,

कृ. ज. थळी.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रं. क्र. ८२६४
ग्रंथ शाखा - ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे

॥ श्रीराम समर्थ ॥

# साधुवर्य
# श्री गुलाबराव महाराज

## यांचें संक्षिप्तचरित्र.

( पुस्तकमाला नंबर तीन ).

हें पुस्तक मुंबई येथील

**रामसेवक चित्रालयांतून-**

*श्रीसंतसंघ पुस्तकमालेचे संपादक,*

**कृष्ण जगन्नाथ थळी.**

REFBK-0000995

दा. क. ९९६

मुंबईत-ज... सिद्ध केलें.

शके १८३६ आनंदनाम संवत्सर चैत्र शु० ९ मी.

इसवी सन १९१४.

किंमत ३ आणे.

# शुद्धिपत्र.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४ | ५ | परिशालिन. | परिशीलन. |
| ७ | ८ | संस्कृत. | स्वकृत. |
| ७ | १० | [ ] | ब्र्याकेट नको. |
| १० | १४ | मी ब्रह्मपणें. | अहं ब्रह्मपणें. |
| ११ | ७ | ते ऋणदार. | तरी ऋणदार. |
| ,, | १० | तें सामर्थ्य तुज. | तें तुज सामर्थ्य. |
| ,, | ,, | त्या लागीं. | या लागीं. |
| १२ | १९ | नखतमो. | नखनमों. |
| १३ | १ | जलद. | जल्द. |
| ,, | २ | समागमों. | संगमों. |
| ,, | ,, | घुमाकार. | घुमाकर. |
| १४ | ५ | आवडी. | अति आवडी. |

# प्रकाशकाचे दोन शब्द.

प्रीय संतभक्त बंधू हो ! **श्रीसंतसंघ पुस्तकमाला** भाग दुसरा यांत येणाऱ्यां पन्नासही संतांची त्रोटक माहिति मिळविण्याचा प्रयत्न चालला असतां श्रीकृपेनें वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध विद्यमान साधुवर्य **श्रीगुलाबराव महाराज** यांजबद्दल माहिती मिळविण्याचा योग आला. या वेळीं श्रीमहाराजांचा मुक्काम **हर्दा** सी. पी. येथें होता. तेथील परम प्रेमळ संतभक्त प्रिय आत्मीय रा. रा. **नारायण रघुनाथ केकरे** वकील, यांनीं त्यांजबद्दलची स्वतःच्या अनुभवानें मिळविलेली सर्व माहिति आम्हांस पाठवून दिली. ही माहिति ह्मणजे महाराजांचें संक्षिप्त **जीवन चरित्रच** होय, असें वाचनांति कळून आलें. " श्रीसंतसंघ पुस्तकमालेतील " संताच्या प्रत्येक फोटोखालीं तात्पर्यानेंच माहिति देण्याची व्यवस्था केल्यावरून हे एवढें चरित्र देणें अशक्य वाटलें व समयानुसार श्रीभगवदीच्छेनें अशी प्रेरणा झाली कीं, हें चरित्र लहानशा सुंदर पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावें, व योगायोगानें झालेली बुद्धी कायम होऊन आज हें पुस्तक बाहेर पडत आहे. अहह ! **"नकळे केवीं योग आला । नकळे केवीं लळा लागला । नकळे केवीं हा गलबला प्रभु मायेचा ॥"** असें म्हणावें लागतें ! प्रभुची लीला अतर्क्य आहे !!

यांत श्रीगुलाबराव महाराजांचें बीजरूपानें सबंध चरित्र आलें आहे. वाचनांति वाचकांची पूर्ण खात्री होईलच. महाराजांचा विस्तृत चरित्र ग्रंथ प्रसिद्ध होण्यास आणखी कांहीं वर्षे लागतील असेंहि आह्मांस समजलें आहे. श्रीकृपेनें तो लवकरच निर्विघ्नपणें प्रसिद्ध होऊन आर्यवर्तांतील समस्त संतभक्त बंधूंस वाचण्यास मिळो अशी आह्मी प्रभुचरणीं प्रार्थना करितों. तत्पूर्वी "दुधाची तहान ताकावर " या उक्त्यन्वयें हें त्यांचें संक्षिप्त जीवनवृत प्रसिद्ध झालें आहे, त्याचा सर्वांनीं संग्रह करून श्रीगुलाबराव महाराजांची अगाध बुद्धिमत्ता, वाङ्मयता, ज्ञानचातुर्यता वगैरे अलौकिक अधिकाराचा अनुभव घ्यावा व या महात्म्याचें अवश्य दर्शन घ्यावें अशी मी प्रेमपूर्वक विनंति करितों.

प्रियतम श्रीयुत केकरे यांनीं माहितीबद्दल श्रम घेऊन श्रीकृपेनें हा योग आणवून आह्मांस दिला याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहे.

—प्रकाशक.

हें

## लहानसें सर्वांग सुंदर चरित्र.

माझे परमपूज्य सर्वसाक्षी सर्वांतर्यामी-


**श्रीसमर्थ वागदेव महाराज यांचे पुण्यचरणीं अनन्य अर्पण असो.**

पद—चाल ( धांव पांव सावळे विठाबाई ).

वागदेवाचें ध्यान पाहुनीं मन्मन सखया बहु रमतें ॥
चरण सोडुनी न जाई परतें हृदिं प्रेमाचें ये भरतें ॥ धृ० ॥
कांति पाहतां दिसे मनोहर, कृष्णवर्ण त्या देहाची ॥
सुंदर बाहू सुहास्य मुख तें, सतेजता बहु नयनाची ॥
पिंवळा फटका शोभे मस्तकीं, गळ्यांत मल्हारी प्रतिमा ॥
काळी घोंगडी स्कंधावरती शोभा ती स्तव ये परमा ॥ वा० ॥ १ ॥
कटीं कडदोरा वरि लंगोटी, करिं कोठंबा भिक्षेचा ॥
व्याघ्रचर्मभंडारी घोळ करकमळीं जोड घंटांचा ॥
घंटानादें निघतां स्वारी नगरीं वागी मागाया ॥
पदोपदीं जन लागति पाया, तोषवुनीया निज हृदया ॥ वा० ॥ २ ॥
राव रंक ज्यां समान अद्वयआनंदाचे पूर्ण निधी ॥
ठायि ठायि निजभक्तां अनुभव देउनि दावी नवल सुधी ॥
उग्रपणा पाहूनि तयांचा भय वाटे जरि चित्तातें ॥
तरी अंतरीं दया अमित त्या पूर्ण कृपा निज भक्तीं ते ॥ वा० ॥ ३ ॥
संकट पडतां निज भक्तासी स्मरणें करि तन्निस्तार ॥
अनुभव याचा जयासि आला, तया कळे तद् अधिकार ॥
परमार्थाचें वर्म अनुभवीं साधकासि दाविति परम ॥
पूर्व सुकृतें फळलीं ज्याचीं होती ते पूरित काम ॥ वा० ॥ ४ ॥
परम दयाळू कनवाळू हे साक्ष पाहतां पदोपदीं ॥
प्रत्यय येतां नते चित्त हें पदीं वळे ही मन बुद्धी ॥
दीन दास वर्णील काय या महिमा महान संताचा ॥
प्रेमा लाउनि दिधला अनुभव ह्मणुनी वदली ही वाचा ॥ वा० ॥५॥

समर्थांची चरण धूळ,—कृ. ज. थळी.

ग्रा. क.



अनुभवसूर्य

श्री समर्थ वाग्देव महाराज.



श्री गुलाबराव महाराज.

|| श्रीराम समर्थ ||

सं. प. नं. १९

श्रीसद्गुरूकृष्णदेवपरमात्मनेनमः

# श्री गुलाबराव महाराजांचें

## संक्षिप्तचरित्र.

*आह्मी वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया १ झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग। उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं २ अर्थ लोपलीं पुराणें । नाश केला शब्द ज्ञानें । विषय लोभीं मनें । साधनें बुडविलीं ३ पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा । तुका ह्मणे करा । जय जयकार आनंदें ॥ ४ ॥* श्रीसमर्थ तुकोबाराय.

**श्री गुलाबराव महाराज** हे वऱ्हाडांतील प्रसिद्ध भगवद्भक्त व अप्रतीम विद्वान महात्म्ये आहेत हें जगजाहीर आहेच. यांचें नांव **गुलाबराव** गोंदूजी मोहोड माधानकर असें आहे.

माधान गांव हें यांचें राहण्याचें मुख्य ठिकाण असून तें उमरावती जिल्ह्यांत एलिचपूर तालुक्यांत आहे. श्रीगुलाबराव महाराजांचा **जन्म** परम पवित्र पुण्यवान माउली सौ० **अलोकाबाई** इच्या उदरीं शके १८०३ वृषनाम संवत्सर आषाढ महिन्यांत लोणी येथें त्यांच्या आजोळीं झाला. [तिथी

मिळत नाहीं यास निरुपाय आहे.] त्यांचे आजे रा. राणोजी-राव हे निस्सीम शिवभक्त होते. महाराजांच्या तीर्थरूपांचें नांव गोंदूजी, यांच्या वयाच्या तिसऱ्या वर्षीं मातोश्री निवर्तली. व तेराव्या वर्षीं तीर्थरूप निवर्तले. हल्ली माभान येथें त्यांचे चुलते असून इतर आप्त मंडळीही पुष्कळ आहे. हे जातीनें सूर्यवंशीं भारद्वाज गोत्री राणा रजपूत असून व्यवहारांत आपणास शूद्र ह्मणवितात. सुमारें नऊ महिन्यांचे असतांनां कांहीं दुर्निमित्तानें यांचे दोन्ही डोळे आंधळे झाले. १२ व्या वर्षीं यांचें लग्न होऊन २४ व्या वर्षीं पत्नी संपली. ही सुशील, सद्गुणी पतीपरायण असून परमार्थांत पतीच्या मनोगतानें वागणारी होती.

महाराजांची अलौकिक बुद्धिमत्ता व भक्ति ज्ञान वैराग्यादि संपत्ति लहानपणापासूनच प्रगट दिसूं लागली. चौदा ते वीस वर्षांच्या अवधींत यांनीं सत्यशोधकादि वेदबाह्यमतांचा मोड करून ब्राह्मणांचा पक्ष घेतला, सामवेदादि ज्ञानानें ब्रह्मवृंदांस संतुष्ट केलें, अमोघनिरूपण ह्मणून प्रणवात्मक विषय लिहिला. सांख्य, योग, वेदांत, वैद्यक व्याकरणादि विषय लोकांस शिकविलें. कोयाळ, भिंगरी. फुगड्या, पिंगा इत्यादि बाल-लीलांनीं व भजन, गोपाळकाला इत्यादि मधुरलीलांनीं

परिचित जनांस प्रेमलुब्ध केलें.हस्तस्पर्शानें व्याधीपीडित जनांच्या व्याधी दूर केल्या, गायत्रीचा अर्थ लेखन केला, नारद भक्तिसूत्रावर ओवीबद्ध भाष्य लिहिलें,हिप्नाटिझम्,वुईल पावर ( *Will Power* ) यांचे प्रयोग करून दाखविले, आंगास देव आणून ढोंग ढांग करून भोळ्या लोकांस फसविणाऱ्या स्त्रिया व पुरुष यांचीं बिंगें बाहेर काढलीं,डार्विन स्पेन्सरादि पारकीय मत वाद्यांचे सप्रमाण व सयुक्तिक खंडण करून मार्मिक जनांस कौतुक उत्पन्न केलें व **अमृतानुभव**,ज्ञानेश्वरी,भारत,भागवतादि ग्रंथांतील विषय आपल्या गद्यपद्यमय रसाळ वाणीनें मराठी व संस्कृत भाषेंत निरूपण करून भगवद्गुण संकीर्तनानें जनांस भक्तीचा मार्ग दाखविला.

पृथ्वींतील सर्व धर्मांचीं तत्वें यांना अवगत आहेत. यच्च–यावत् लौकिक व अलौकिक शास्त्रांचें हृदय यांच्या करतलगत आहे. जगांतील कोणत्याही भाषेंतले धर्मशास्त्रविषयक विचार यांना समजतात व श्रुति युक्ति अनुभवानें ते दुसऱ्यास समजाऊन देण्यांत कुशल व अधिकारानुसार नित्य नूतन साधन प्रक्रिया सांगण्यांत ते प्रवीण आहेत. सांख्य, योग, वेदान्तादि शास्त्रांची मूळ परंपरा सोडून ज्या टिकाकारांनीं त्यांवर टिका लिहिल्या त्यांचें यांनीं खंडण केलें. यांची कविता-

शक्ति तात्काल स्फूर्तिजन्य अशी आहे. प्रत्यहींनूतन प्रेमळ पद्यांनीं भगवंताला आळविणें, गद्यपद्यमय ग्रंथरचना करून बद्धांस सन्मार्गगामी करणें व मुमुक्षूंचा उद्धार करणें, गुणी जनांची मैत्री संपादन करणें, प्राचीन व अर्वाचीन विद्या-ग्रंथांचें परिशलित व व्यवहारांचें निरीक्षण करणें, चांगल्या उक्तींचा संग्रह करणें इत्यादि विद्या व्यासंगांत यांचा काळ जात असल्यामुळें यांचें जेथें वास्तव्य असतें तेथून वाद, भेद, निंदा हे कलिकाळाचे फंद देशोधडी होऊन कृतकालीन न्याय धर्म हरिनाम तेथें नांदू लागतात.

श्रीगुलाबराव महाराजांचें आचरण अत्यंत शुद्ध व वेद-मार्गाला धरून आहे. विनय तर यांची मोठी संपत्तीच आहे. उपासना दृष्टीनें हे हरिहरोपासक असून मधुराद्वैताचे पुरस्कर्ते व मधुराद्वैतदर्शनाचे आचार्य आहेत. ज्ञानोत्तरकालीं दृष्ट-दुःख निवृत्तिकरितां भगवद्भक्ति पाहिजे हें यांचें ध्येय आहे. व एवढ्याचकरितां स्वतःला ते ज्ञानेश्वर कन्या व श्रीकृष्णपत्नि ह्मणवीत असून मंगळसूत्र, वेणी, कुंकुमादि सौभाग्यचिन्हें त्यांनीं धारण केलीं आहेत. नित्यपार्थिव पूजा, व श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांची व श्रीकृष्णमूर्तीची पूजा एकवार भोजन गुरुवारीं श्रीज्ञानेश्वर महाराजांची पालखी, द्वादशीला काला. वर्षांतून एक दोन वेळ आळंदीची वारी, प्रतिवर्षीं मार्गेश्वरांत

कात्यायनी व्रतोत्सव, माघ वद्यांत महाशिवरात्र्युत्सव, श्रावण वद्यांत श्रीकृष्णजन्मोत्सव, चैत्रांत रामनवमी हें यांचें नित्य नैमित्तिक आहे. यांची बहुतेक चर्या रात्रीं चालत असते. व्यवहारांत यांची वागणूक श्रुतां संतशीलास अनुरूप अशी चोख व सरळ असते. यांच्या वयाचीं पहिलीं वीस बावीस वर्षें माधानांत व आसपासच्या खेड्यापाड्यांतच बहुतेक गेली. आलीकडे आठ दहा वर्षांतच यांचा सत्कीर्ति परिमल लांबवर पसरलेला आहे.

आर्वीचे श्रीयुत दामोदर आप्पाजी महाराज व अकोल्याचे श्रीयुत घोंगे शास्त्री यांसारख्या प्रेमळांनीं मोठ्या आवडीनें यांच्याजवळ आपलें हितगुज सांगितलें आहे. काशी येथील प्रसिद्ध श्री कृष्णानंदासारख्यांनीं यांनां श्रीकृष्ण व नारद यांच्या बरोबरीचें ह्मटलें आहे. प्रयाग येथील पंडित आदित्यराम भट्टाचार्यासारख्यांनां हे केवळ बाल बृहस्पति व आधुनिक आंग्लविद्याविभूषित विद्वानांस हे एक,—Intellectual Phenomena—ह्मणजे बौद्धिक घटना वाटत आहेत. एवढी अलौकिक बुद्धिमता यांनां आपो-आप कशी प्राप्त झाली? या कोड्याचें उत्तर ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाच्या ४५३–५४ ओंव्यांत आहे त्या अशा:—

तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेंचिया गांवा न येतां ॥
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥ ४५३ ॥
तिये सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ॥
मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ४५४ ॥

शब्दावरून माणसांचा व ग्रंथांचा स्वभाव ओळखणें हा त्यांचा मोठा दृष्ट चमत्कार आहे. ते स्वतः चमत्कारांचा व करामतींचा अत्यंत निषेध करीत असून त्यांची सगळी खट-पट आश्रित जनांची बुद्धि वाढविण्याविषयीं असते. यांची वागणूक सर्वांशीं मित्रत्वाच्या नात्यानें असून साह्यकर्त्यांस ते गुरू ह्मणून मान देतात. **बाळपणचे खेळ, स्वच्छंदविहार, एकांतांची** आवड इत्यादि गोष्टी यांच्या ठिकाणीं अझूनही तशाच कायम आहेत.

श्री **गुलाबराव महाराजांचें** रहाणेचें मुख्य स्थान अमुकच ठिकाणीं असें नाहीं. ते अत्यंत स्वेच्छाचारी बाळपणापासून आहेत.—

**जातो तें स्थळ सांगेना । सांगितलें तेथें जाईना ॥**
**आपली स्थिति अनुमाना । येवोंचि नेदी ॥ १ ॥**

ह्या दासबोधांतील समर्थोद्गारांप्रमाणें त्यांचें वागणें आहे. घटकेनें कोठें जातील याचा नेम सांगतां येत नाहीं. वाटेल

तर पुन्हां पूर्वस्थळीं परत येतात, किंवा दुसऱ्या मुक्कामीं आपला पुस्तक संग्रह बोलावून घेतात. तोंपर्यंत त्यांचा पुस्तक संग्रह चार आठ दिवस पूर्व मुक्कामालाच असतो, ह्यांचा पुस्तक संग्रह बहुतेक त्यांच्या बरोबरच असतो. शिवाय ते जातात तेथून लेखी व छापील ग्रंथ मिळतील तेवढे मिळविण्याची त्यांची खटपट असतेच.

श्री **गुलाबराव महाराजांचा** ग्रंथसंग्रह आज सुमारें दहा बारा हजार रुपये किंमतीचा आहे. यांच्या संस्कृत ग्रंथांतून कांहीं ग्रंथ **सूक्तिरत्नावली** या नांवानें आजपर्यंत सात भागांत छापून प्रसिद्ध झाले आहेत. [ **अनेक शंका कुशंकांचें निरसन करून होईल तितक्या रितीनें धार्मिक व शास्त्रीय विषय पटवून देण्याची त्यांची प्रतिज्ञा आहे.** ] ग्रंथ लेखन वाचनाच्या कामांत यांना मुख्यत्वें साह्य करणारे **चांदा** येथील श्रीयुत **नारायणराव** पंडित व उमरावतीचे श्रीयुत **हरिभाऊ केवले** हे आहेत.

ग्रंथ वाचनाची महाराजांची पद्धति फारच विलक्षण आहे. ग्रंथ कितीही नवीन असो त्याच्या अनुक्रमणिकेवरून किंवा प्रस्तावनेवरून आंतील विषयाचें स्वरूप त्यांच्या चटकन ध्यानांत येतें. पूर्वाचार्यांचे ग्रंथ, प्राचीन शास्त्रीय व पुराणादि

११५

ग्रंथ हे देखील त्यांनां साग्र कोणी आजपर्यंत वाचून दाखविलेले नाहींत. "अमुक ग्रंथांतील अमुक प्रकरण किंवा भाग वाच" असेंच ते बहुतकरून सांगत असतात.हा प्रकार देखील अलीकडे ५।७ वर्षांतला आहे. पहिल्या २०।२२ वर्षांत ते खेडवळ भागाच्या फारसे बाहेर गेलेले नाहींत व नंतर उमरावतीस आले तेव्हां पहिलीं एक दोन वर्षें ग्रंथ वाचन कचितच चालत होतें. ज्ञानेश्वरीवर ओवीबद्ध निरूपणें व नवीन अभंग, पदें, गाणीं वगैरे व मधून मधून ग्रंथ लेखन हींच फार होत, शिवाय हल्लीं देखील भेदधिक्कार, श्रीहर्षाचें खंडनखंडखाद्य यांसारखे कठीण ग्रंथ वांचून दाखवितांनां वाचकांची नुसत्या शब्दा पलीकडे कितपत दृष्टि जात असेल हें त्यांनांच माहित. परंतु इतक्याही भानगडींतून सनातन वेदश्रुति सिद्धांताशीं न मिळणाऱ्या मतांची योग्य व मार्मिक समीक्षा करून सनातन धर्माचे श्रुतिशुद्ध सिद्धांत महाराज नवीन तऱ्हेनें व श्रुतियुक्ति अनुभवानें कसें प्रतिपादन करतात व नूतन प्राक्रियायुक्त रहस्यमय ग्रथांत ते किती चटकदार रीतीनें लेखन करितात याची यथार्थ कल्पना त्यांच्या सहवासावांचून होणें शक्य नाहीं. त्यांच्याहून अनेक पटीनें अधीक काळ घालवून ग्रंथ वाचनाचा उद्योग सामान्य मनुष्यानें केल्यास त्याला असें सामर्थ्य येईल किंवा नाहीं हा संशयच आहे.ह्या सगळ्या गोष्टी ध्यानांत

घेऊन विचार केला असतां, "यांनां सगळी विद्या पुस्तकें वाचून आलेली आहे" अशा प्रकारची तार्किक पद्धतीची कोटी कोणी केल्यास ती क्षणभरही टिकणें शक्य नाहीं.

श्रीमहाराजांचा त्यांच्या स्वज्ञातिबांधवांवर प्रेम आहे व त्यांनां संस्कृत वगैरे शिकवून त्यांची उन्नति करण्याची महाराजांनीं वाटेल तेवढी खटपट केली परंतु हे ब्राम्हणांस अनुकूल आहेत अशा समजुतीनें कीं काय कोण जाणें त्यांनां कोणी साह्य झालें नाहीं. असो--

महाराजांच्या **अपार वाङ्मय** रत्नभांडारांतून थोडीशीं पद्यरत्नें खालीं दिलीं आहेत.

**श्लोकपृथ्वी**—अलंदिपतिपादगांगजलमज्जनाःसज्जनाः ।
भवांबुधिपरांतगाम्परमशांति मायांति ते ।।
तदीयपदपांसुनामहमहर्निशं रागवान् ।
उपात्तमति योग्यता लिखितमेतदुल्लेखये ।।१।।

**मालिनी**--शशिशिररतिपात्रं शुद्धचैतन्य मात्रं ।
विमलसुगुणगात्रं भक्तसंछिन्नरात्रं ।।
निगमगतिविहारं संभृतांधांध भारं ।
व्रजयुवतिविलासं व्रीडहासं प्रणौमि ।। १ ।।

**स्त्रग्धरा**–धर्मात्संसिद्धसत्वे हरिहर भजनाच्चित्तचांचल्यहाने-
रात्पाद्युक्त्यानुवृत्या श्रुतिमनननिदिध्यासनैः सत्समाधेः।

ज्ञानाद्ब्रह्माऽहमस्मीत्यनुभवबलकात्संचितागामि मुक्ता
धैर्यायारब्धमुक्तौ तनुमयिचशुभे नंदनानंदभावम् ॥१॥

तावद्वेदाधिकंशास्त्रं धर्मस्तावत्समाचरेत् ।
यावन्न जायते प्रीतिः कृष्णे योगेश्वरेश्वरे ॥
चमत्कारान्परित्यज्य सर्वान्संसारदायकान् ।
शिवकृष्णाविष्टचित्ता सद्गुणान्परिपालय १

ओंव्या.—भक्तिपदतीर्थामृतांतील.

मातृकुळासि संबंध सुटला । स्वामिनीपणाचा ठावो लाधला । इतुक्यानेंच न मानी पतिला । तरी पतिव्रता ते नव्हे ॥ १ ॥ जरी वंदील पतीचे चरण । तरीच शोभे स्वामिनीपण ॥ नातरी वेश्या हें बोलण । माथांचि ये ॥ २ ॥ मग भलताचि चालवो सत्ता । तेणें अनेक कष्ट तत्वतां । आणि कष्ट करूनिहि मधुरार्था । बोलती न कोणी ॥ ३ ॥ तैसा ज्ञानाभिमानें फुगला । मी ब्रह्मपणें चवताळला । तो सर्वस्वी मुकला । भक्ति सुखातें ॥ ४ ॥ लोहश्रृंखळा त्यागूनि । कनकश्रृंखळा घातली चरणीं । तरी चोर नेतील या भयें करूनि । व्याकुळ चित्त ॥ ५ ॥ सोनेंहि आपुलें नाहीं झालें । पाय दुखणें तैसेंचि राहिलें । बंधन असोनि उगेंचि आलें । रक्षकत्व माथां ॥ ६ ॥ तैसा अहंब्रह्मास्मि ज्ञानें

ग्रंथा. नं. १८

फुगला । तो अभिमान बंधीं मात्र राहिला । आणि उत्थान भयें तयाला । व्याकुळता न सोडी ॥ ७ ॥ प्रारब्धाचें दुखणें । न सुटे भोगल्याविणें । ब्रम्ह होऊनि जगीं विचरणें । लाजिरवाणें हेंहि एक ॥ ८ ॥ न भजतां व्रजराज बिंडा । तो सर्व देशीं काळ तोंडा । आह्मी ऐसिया भांडा । पुढें न राहूं ॥९॥ ज्याच्या वेदोपदेशें वहिले । ब्रह्मज्ञानी पूर्ण झाले । शेखीं तयाचीं सोडितां पाउलें । ते ऋणदार जाहले हरीचे ॥ १० ॥ आणि ज्ञानाभिमानें हा एक न मानी । तरी काय हरिसत्ता होतसे उणी । परी हाचि अभिमानीं । मेला ठाके ॥ ११ ॥ जेणें कामें तारिल्या गोपिका । तें सामर्थ्य तुज नये लेंका । त्यालागीं तो भजावा निका । नंदनंदनु ॥ १२ ॥ तूं जरी ब्रह्म जाहला आंगीं । तरी भौतिक देह न सोडी तुजलागीं । आणि हरिभक्ति करितां देहसंगीं । ब्रह्मरूप होशील ॥ १३ ॥

## प्रियलीलामहोत्सवांतील. प्रयत्नवादाविषयीं.—ओंव्या.

भगवत्सहायें प्रयत्नाधीन । कालही वश होय पूर्ण । यालागीं कलियुग आहे म्हणून । धर्म खंडण न कीजे ॥ १ ॥ “ सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परी तेथें भगवंताचें । अधिष्टान पाहिजे” १ या श्रीसमर्थ वचनीं । विश्वास ठेवावा आवडी करूनी । बळेंचि मन इंद्रियें रोधुनि । आणावा

धरणी जगत्पती ॥ २ ॥ युगाचें पाहोनि बळ । सज्जनीं यत्न करावा प्रबळ । तेणें अवश्य वैकुंठ पाळ । प्रगटे हृदयीं ॥ ३ ॥ मग जो व्यष्टि हृदयीं प्रगटे । तोचि समष्टि ब्रम्हांडीं थाटे ॥ तेथ कालबळ नेटें । कांहीं न करी ॥ ४ ॥ ह्मणोनि काल दैवादिवाद । स्वयें जाणोनि असिद्ध । भगवत्सहायें प्रयत्नवाद । नित्य सिद्ध आश्रयिती ॥ ५ ॥

छंद-

शिशु था तब तैं मन खेल कियो निज मीतनसूं लरिके लरिके।
धन कामिनिलोभ कियो अति यौवन मान हृदें भरिके भरिके।
अब पाय जरा नित रोवत है रुजतानलमो जरिके जरिके।
सठ ग्यान सुरेश कृपा बिन तूं कई बेर भयो मरिके मरिके १

## स्फुट-अभंग व पदें.

पद—येइं रमारंगे माउली येइ रमारंगे । भुवन सुंदरे गुण मंदिरे कीर्तनीं नवरंगे ॥ धृ० ॥ परम मनोहर मधुरमोहरी वाजवि सारंगे ॥ ये० ॥ १ ॥ सुंदर लोचन कृपा कटाक्षें । हृदय तिमिर भंगे ॥ ये० ॥ २ ॥ आळंदिशे तव नांव गाऊनी । नाचुं सुजन संगें ॥ ये० ॥ ३ ॥

पद—पाई जनम मानुखकी भाई गुन गोविंद के गानाबे । श्रीकमलापत चरन नखतमो दिलं अनमोल लगानाबे ॥

१ वत्सले – पाठांतर.

धृ० ॥ काया मायादि ये जानिमन जलद छोरकर जानाबे। संत समागमों अंग घुमाकार तनकी आग बुझानाबे ॥ पा० ॥ १ ॥ अंधा हो परधन परनारी किमपी मन नही लानाबे। ध्यान पकडकर खडा रहे तब कबु दिलको न हिलानाबे ॥ पा० ॥२॥ अयन बयन करी एक देख फिर समान मट्टी सोनाबे। अलकावति पतिकांत सौख्यमें शांत कालत्रय सोनाबे ॥ पा० ३

पद–जय जयकार तुझा। वेद पुराण वाणिती सहजा ॥धृ० एक अखिल जगव्यापक प्रभु हा। याविण नाहीं दुजा ॥ ज०१ वेद पुराण ह्मणती प्रणवार्थचि। जो प्रगटे सहजा ॥ ज० ॥२॥ सच्छांदोग्यीं ऐतरेयीं आत्मा। ब्रह्मबृहती उमजा ॥ ज०॥३॥ अलकावति वल्लभ केन श्रुतौ। मना सगुण नमीं जा ॥ ज० ४

पद–दाद ना फिर्याद माझी तुमचे द्वारीं। हाका मारीतांही लोटुनी लाविति माघारीं ॥ धृ० ॥ तुह्मी कृपाळू गडी तूमचे संत कृपावंत। दयाळा साधु कृपावंत। मलीन वा निर्मळही बाहतां नाहीं मज उसंत ॥ दा० ॥ १ ॥ आईकडे सांगावें तों ते सभाग्यास पाहे। जय विजयादिक निरोधितां मग आंत रीघ नोहे ॥ दा० ॥ २ ॥ कधीं उदय दैवाचा होईन[1] पाहीन पादुका। अलकावति वल्लभा तुह्मांवरी उधळिन फुलबुक्का ॥ दा० ॥ ३ ॥

---

१ हा होईल या अर्थी वऱ्हाडी भाषेंतला प्रयोग आहे.

पद्–स्वप्नामध्यें जसा भिकारी आणिक तो नृपवर । तस संसारिक जीवेश्वर ॥ धृ० ॥ स्वप्न निमाल्या जागृतिमध्यें नरचि मंचकावर । तसें हें ब्रह्मचि सर्वांवर । अजुनि कसा तुज उमज न वाटे अशुद्ध तव अंतर । देई तूं सांडुनि धर्मांतर ॥ चाल ॥ करुनियां प्रथम कर्मे तीं आवडी । निज मनोमळांची करि गगनीं वावडी । मग उपासनेनें हरिपद्कण सांवडी । ॥ पूर्वचाल ॥ जाइल तो विक्षेप चित्त मग सोडिल दोषाकर । होइं तूं श्रीगुरुचा चाकर ॥ स्व० ॥ १ ॥ स्वप्निं जसी कामिनी पाहुनी काम मनी अति भरे । तसें हें अमरपूर तूं वरे । यास्तव सोडुनि काम फळातें गुरुपद सेवे करें । तोडिं षड् वैरीस्थळ नीकरें ॥ चाल ॥ या मनुष्य जन्मीं साधी परमार्थता । मग पुढें न ऐसी अमोल संधी आतां । निज करून भोगी संसारीं स्वार्थता ॥ पूर्वचाल ॥ करुनि विवेक विरक्ति शमादि षट्कमुमुक्षापर । होउनी गुरुपदीं ठेवी शिर ॥ स्व० ॥२॥ स्थूल लिंग कारण हे वारी जीवदेह पैं त्रय । वारि तूं ईश्वर देहहि त्रय । मायामय ईश्वर वाच्यांश तत्पद जाणुनि स्वयें । अविद्या जिवत्वं पद वाच्यये ॥ चाल ॥ माया अविद्या दोन्ही तूं सांडुनी । मग घेई आपुली परब्रम्हता जुनी । जेथ जीवेश पणातें होय अवघी धुनी ॥ पूर्व चाल " [illegible] पाहुनि सच्चिद्धन स्वानंदमय सत्वर । होउनी प्रेमें भरा अंतर ॥ स्व० ॥३॥

यापरी लक्षांश घेउनी तूं ब्रम्ह होशि जेधवां । उरे मग हरिभक्तिच तेधवां । जशी कुमारी लग्न होउनी पटराणी आसवा । उरे मग भजणें आपुल्या धवा ॥ चाल ॥ त्यापरी मुक्ति झालिया भक्ति आचरी । जन दीन पाहुनी करिं धरुनी उद्धरी । ज्ञानेश्वरप्रभुचरणसलिल तूं पान करी सत्वर । आणि सिंचन करी दीनांवर ॥ स्व० ॥ ४ ॥

अभंगः—इच्छाचारें मही धुंडीतां आवडी । घालूं नये उडी माना मागें ॥ १ ॥ शपथ वाहुनी करूं नये खोटें । सुख दुःख मोठें साहावें कीं ॥ २ ॥ रावऋषीसंग महाभारतींचा । अंतरीं तो साचा धरा दृढ ॥ ३ ॥ विषम विषयीं न देयावें चित्त । निश्चय यथार्थ सोडूं नये ॥ ४ ॥ असतां रक्षक आळंदी विलास । आणिकांची आस धरूं नये ॥ ५ ॥

अभंग.—वैराग्या वांचूनी सांगूं नये ज्ञान । शुद्ध फसवण दीनाची ते ॥ १ ॥ रागद्वेष ज्यांचे नाहींत निमाले । बोल वायां गेले सर्व कांहीं ॥ २ ॥ शरीरा पुरतें अन्न आच्छादन । आणिक थुंकोन सर्व घाली ॥ ३ ॥ सुलभाजनक शब्द आणी ध्यानीं । न रहावें मौनी सापराधा ॥४॥ शिष्य वाढवोनी करूं नये सोंग । येणें रमारंग अंतर तो ॥ ५ ॥ आळंदी वल्लभ येवोनी अरण्यीं । घाली मुखीं पाणी दासाचिया ॥ ६ ॥

अभंग.— मानची पाहतां जया वाटे प्रेम । अपमानी धर्म द्वेषभाव ॥ १ ॥ ऐसे गुरुशिष्य दोन्ही कुंभीपाकीं । होऊनीयां शेखीं देव नाहीं ॥ २ ॥ म्हणोनियां मिळे तैसेंचि रहावें । न पेटावे हावे कशाच्याही ॥ ३ ॥ आळंदी वल्लभीं ठेवावा विश्वास । स्वर्गादिकीं आस सांडोनीयां ॥ ४ ॥

अभंग.–धनमान दोन्ही प्रारब्धाचे हातीं । यत्नें रमापती मात्र भेटे ॥ १ ॥ म्हणोनी संसारीं सदा व्हावें सम । व्रजवरीं प्रेम ठेवोनीयां ॥ २ ॥ हर्ष विषादातें तिळांजुळी देणें । षडरी दमणें युक्त सदा ॥ ३ ॥ आळंदीवल्लभ न उपेक्षी दीना । उच्च किंवा हीना समतारी ॥ ४ ॥

अभंग.–धर्मचाड तरी पहावें भारत । समन्वयीं चित्त ठेवोनीयां ॥ १ ॥ नीति चाड तरी गावें रामायण । वाल्मिकी कीर्तन काव्य शुद्ध ॥ २ ॥ भक्ति चाड तरी शुद्ध भागवत । सदा हृदयांत ठेवा वेगीं ॥ ३ ॥ ज्ञान चाड तरी वासिष्ठ स्मरावा । अंतरीं धरावा गुह्य भाव ॥ ४ ॥ गुरु चाड तरी स्मरा ज्ञानेश्वर । हेंचि धर्मसार बोलिलें म्यां ॥ ५ ॥

श्रीगुलाबराव महाराजकृत जे ग्रंथ सूक्तिरत्नावली नांवानें आजपर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत, त्यांचे एकंदर सात भाग आहेत. प्रत्येक भागाला यष्टि असें नांव आहे. एक एक यष्टींत आलेल्या ग्रंथांचीं नांवें खालीं लिहिलीं आहेतः—

## प्रथम यष्टि.

भक्तिपद तीर्थामृत, निगमान्तपथ संदीपक, चौसष्टी, पत्रें १ ते ११, श्रीमद्भगद्गीतासंगति, निदिध्यासन प्रकाश, कान्त कान्तावाक्यपुष्पम् ( संस्कृत ), सूचना प्रकरण.

## द्वितीय यष्टि—पूर्वार्ध.

कृष्णपंचपदी, सद्वैजयंति, बाराखडी, चित्तोपदेश, त्रिकांडसार, तुंबडी, चिरंजीव पदाभ्यास, शांति सुधाकर, सोपान सिद्धि, नित्यतीर्थ, मणिमंजूषा, प्रिय पाहुणेर, अलौकिक प्रवास, अमोघ निरूपण, स्त्रीगीत, अपराध क्षमापन स्तोत्र.

## द्वितीययष्टि–उत्तरार्ध.

गुरु पंचपदी, पत्रें सुमारें २०, ध्यानयोगदिवाकर, भगवद्भक्ति सौरभ, प्रीतिनर्तन, गोविंदानंदसुधा [ संस्कृत ], श्री ज्ञानेश्वरमातृपितृभावनाष्टक, सूचना प्रकरण.

## तृतीययष्टि—प्रियलीलामहोत्सव.

ही श्रीमद्भागवताच्या प्रथम स्कंधावर गद्यपद्यात्मक टीका

असून यांत श्रीधर स्वामींनीं स्पष्ट न केलेले अनेक अभिप्राय स्पष्ट केले असून विषय प्रतिपादन शैली नवीन व श्रुतिसंत वचनसम्मत अशी आहे.

### चतुर्थयष्टि—स्त्रीगीतसंग्रह.

यांत अनेक विषय स्त्रीगीताच्या चालीवर प्रतिपादन केलेले आहेत.

### पंचमयष्टि—अलौकिक व्याख्यानमाला.

यांत—एकंदर नऊ व्याख्यानें असून पारकीय मतांचें समालोचन केलेलें आहे. व शेवटल्या "अमरत्व शोध" नांवाच्या व्याख्यानाचा उपसंहार येणेंप्रमाणें केलेला आहे:— "झाला तितक्या रीतीनें सर्व पारकीय दृश्य अदृश्य शास्त्रांचा विचार करून प्रिय बांधव हो, आपण जसे लिंग शरीरापर्यंत येऊन पोंहचलों आहोंत, तसे त्या शास्त्रांचे निर्माणकर्तेही पोंहचले नाहींत, ह्मणून असाच विचार कितीही चालू ठेवला तरी त्याच्या पुढें आपल्यास वैदान्तिक पद्धतीवांचून जाणें शक्य नाहीं."

### षष्टमयष्टि—स्वमंतव्यांशसिद्धांततुषार.

हा हिंदी भाषेंत प्रश्नोत्तररूप गद्यात्मक प्रबंध आहे. यांत

मधुराद्वैत भक्तीचें प्रयोजन व श्रीकृष्णावताराचें पूर्णत्व फार चांगल्या रितीनें सोपपत्तिक सिद्ध केलेलें आहे.

### * सप्तमयष्टि—उपदेशामृत.

• यांत ३७ पत्रें असुन त्यांत भक्तिज्ञान वैराग्यादि पारमार्थिक विषयांचें विवेचन व प्रचलित सामाजिक धार्मिक व औद्योगिक परिस्थितींची समीक्षा आहे.

तात्पर्य,--

**श्रीगुलाबराव महाराजांच्या एकंदर चरित्र महोदधींत**

त्यांच्या वाङ्मय मधुर लहरींचा सुस्वादुपणा व महत्व फार मोठें आहे, तें त्यांच्याच शब्दांनीं सांगतां येण्यासारखें आहे ते शब्द हे. —

" तो ब्रह्मनिष्ट श्रोत्रिय साचारी ॥ त्याची प्रगटे जे वैखरी ॥
ते ब्रह्मतनयाचि ग्रंथाकारी ॥ निगम प्रणवरूपिणी ॥"

---

** या आठही ग्रंथांची एकंदर* **किंमत दहा रुपये** *आहे. परंतु आगाऊ* **दोन रुपये** *देऊन नांव नोंदविणारांस ते व त्यांपुढें निघणारे ग्रंथ पाऊणपट किंमतीस मिळतील.*

---

वरील सूक्तिरत्नावलीचे सर्व ग्रंथ- श्रीसंतसंघ पुस्तकमाला कार्याश्रम, रामसेवक नं० ४ या पत्यावर मिळतील.

## स्वात्मतत्वामृतशतक.

**गोमांतक**—डोंगरी, येथील प्रसिद्ध साधुवर्य ब्रह्मीभूत श्रीकृष्ण महाराज बांदकर यांनीं १०१ श्लोकांचा वरील नांवाचा गहन विषयावर सोप्या व सरळ भाषेनें ग्रंथ रचिला आहे. यांत १०१ श्लोक असून आणखी १८ पदें व ( १ ) श्री राघवाष्टक ( २ ) पतितपावन रामश्लोकाष्टक ( ३ ) जानकीजीवनराममंत्रार्थाष्टक ( ४ ) राजीवनयनराम श्लोकाष्टक ( ५ ) आनंदघनराम मंत्रार्था व ( ६ ) श्री सीताराम मंत्र श्लोक अशा पूर्ण प्रेमरसानें ओथंबलेल्या कविता दिल्या आहेत. किं. ६ आणे, शि पोष्टखर्च. एकदम चार प्रति मागविल्यास पोष्टखर्च पडणार नाहीं.

पत्ता--**रामसेवक चित्रालय**, मुंबई नं० ४.

## नमुन्यासाठीं खालील श्लोक वाचावे.

मी हा शब्द उठे जिथें स्वरूप तें, सच्चित्सुखात्मा तुझें ।
देहादी जड विश्व ज्यामधिं स्फुरे तो तूं स्वयें ना दुजें ॥
आहे आपण मीपणारहित हे लक्षीं मुळींची खुणा ।
दृश्यादृश्य गिळोनि तन्मयपणें हो तूं तुझा देखणा ॥४७॥
निद्रेमाजि जसा निवृत्ति असती जागेपणीं हो तसा ।
आनंदांत मुरोनि विस्मृति न घे रक्षी सुखात्मा ठसा ॥
जें जें पाहसि तें सुखात्मक असे येईल लक्षीं तुला ।
तूं आनंदसमुद्र विश्व लहरी जाणोनि घोटीं मुला ॥ ४८ ॥
आहे कोण सदैव होंचि विवरी कीं दृश्य त्या देखणा ।
नाहीं त्या अवलोकिं कोण धरि त्या आहेपणाची खुणा ॥
निद्रा जागृति स्वप्न यासि वळखे नाशे न त्यांच्या सम ।
आहे आपण पूर्ण व्यापकपणें लक्षूनि टाकी भ्रम ॥ ४९ ॥